# डी.एन.पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात सायबर गुन्हे जनजागृती उपक्रम संपन्न



शहादा : पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाच्या डी.एन.पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सायबर क्राईम अवेअरनेस याविषयी विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,क्विक हिल फाऊंडेशन,सायबर सेल महाराष्ट्र पोलीस यांचे संयुक्त विद्यमाने सायबर क्राईम अवेअरनेस या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. राजेंद्र पाटील(कार्यक्रम अधिकारी रासेयो) यांनी केली. कु. गायत्री ठाकरे आणि कु. श्रेया भोम्बे यांनी विद्यार्थ्यांना साइबर क्राइम विषयी सविस्तर माहिती दिली.याप्रसंगी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जे. पाटील, प्रा. व्ही. के. पाटिल, प्रा. व्ही. एस. महाजन व इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांतर्फे जितेन्द्र कुलकर्णी आणि कु. रवीना धनगर यांनी अभिप्राय व्यक्त केले.सूत्रसंचालन व आभार प्रा. धीरज शुक्ला यांनी केले.

या उपक्रमाचे पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूर दीपक पाटील, प्राचार्य डॉ.एन.जे. पाटील यांनी स्वागत व कौतुक केले आहे.